**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.फारुक महमद हुसेन कमिशनर
१३०/२५,सिध्देश्वर पेठ,सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
सो.म.पा.शिक्षण मंडळ सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
सोलापूर सोशल इंग्लीश मिडीयम स्कूल,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०६.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,<br>सो.म.पा.शिक्षण मंडळ सोलापूर सौ.मृ.का.भोसले तर्फे श्री.म.रफिक खान | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.फारुक महमद हुसेन कमिशनर यांनी सोलापूर सोशल इंग्लिश मिडियम स्कूल, सिध्देश्वर पेठ, सोलापूर या शाळेकडे मागितलेली माहिती न दिल्याच्या कारणावरुन प्रथम अपील केले होते. तसेच शासनाकडून मान्यता नसताना अनधिकृतपणे शाळा चालविल्याची तक्रार केली होती. या तक्रारीबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. मात्र शाळा कायम विना अनुदानित असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ तिला लागू होत नाही, असे शाळेच्या वकिलांचे

म्हणणे आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सो.म.पा. शिक्षण मंडळ, सोलापूर सौ.मृ.का.भोसले यांचे प्रतिनिधी श्री.म.रफिक खान यांनी केले.

शाळा कायम विना अनुदानित असल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनिमय,२००५ या शाळेला लागू होणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दशरथ लिंबराज गायकवाड
मु.पाथरी, पो.शिराळे,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,**
विभागीय समाजकल्याण कार्यालय,
पी.एम.टी. पुणे विभाग,
वर्कशॉप जवळ, स्वारगेट,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,**
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९५/२०१०/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नाईक प्राथमिक आश्रम शाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, या शाळेतील सह शिक्षकांच्या पदोन्नती संदर्भातील माहिती | |

**विवेचन**

'मी मागणी केलेली माहिती मला दि.१९/०६/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्याकडून मिळाली असून या संदर्भात माझी कसलीही

तक्रार नाही. माझे संदर्भीय अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.दशरथ लिंबराज गायकवाड यांनी दि.२२/०६/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 JUN 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दशरथ लिंबराज गायकवाड
मु.पाथरी, पो.शिराळे, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक (माध्यमिक),
ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दशरथ लिंबराज गायकवाड
मु.पाथरी, पो.शिराळे, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक (माध्यमिक),
ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.पी.बनसोडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक (माध्यमिक), ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी मूळ अर्जावर उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा विशेश जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर निर्णयानंतरही कोणतीही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दशरथ लिंबाजी गायकवाड यांनी केली.

श्री.गायकवाड यांनी सन २००५ पासूनची माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली होती. परंतु ही माहिती आपल्या कक्षेतील नसून संस्थेच्या ताब्यातील असल्यामुळे आपण ती देऊ शकणार नाही, याची कल्पना अपीलकर्त्यास आपण वेळोवेळी दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक (माध्यमिक), ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.पी.बनसोडे यांनी केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी यांनी नमूद केले.

विशिष्ट नमुन्यातच माहिती मिळण्याचे बंधन अपीलकर्ता घालू शकत नाहीत. मात्र मागितलेली माहिती दिली जाणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक (माध्यमिक), ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी संबंधित संस्थेला तशी

सूचना द्यावी व अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती पुरवावी. त्यानुसार पूर्तता न केल्यास संस्था कारवाईस पात्र ठरेल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) मुख्याध्यापक (माध्यमिक), ज्ञानदीप आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर या शाळेच्या चालक संस्थेच्या कक्षेत असलेली व अपीलकर्त्याने मागितलेली माहिती १५ दिवसात देण्याचे आयोगाचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी संस्थेला कळवावे व संस्थेने त्याबाबत कार्यवाही न केल्यास संस्थेवर प्रशासकीय कारवाई करावी, या आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी दि.३०.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
11 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण दत्तात्रय खरात
द्वारा राजू जमदाडे
मु.पो.वालचंदनगर (जमदाडे वस्ती),
ता.इंदापूर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय,
ता.इंदापूर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय,
ता.इंदापूर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>इंदापूर तहसील कार्यालय,<br>ता.इंदापूर,जि.पुणे श्री.एच.एस.पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>इंदापूर तहसील कार्यालय,<br>ता.इंदापूर,जि.पुणे श्री.एन.पी.पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.०९.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण दत्तात्रय खरात यांनी एका गुन्ह्यातील प्रशासकीय कार्यवाहीच्या माहितीसह संजय गांधी निराधार योजनेविषयी विस्तृत माहिती मागितली होती. संबंधित गुन्ह्यातील कागदपत्रांच्या नकला त्यांना देण्यात आल्या आहेत. संबंधित प्रकरणातील श्री.सदाशिव निवृत्ती खरात यांचे बंधपत्रातील नमूद केलेली रक्कम वसूल करण्याची मागणी त्यांनी केली होती. नियमानुसार कार्यवाही करुन अशी वसुली केली. त्याची माहिती श्री.खरात यांना दिली. संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थींच्या गाववार याद्या उपलब्ध नाहीत. उपलब्ध असलेल्या बँक निहाय याद्यांच्या छायांकित प्रती अनुदानाअभावी देता येणार नाही. त्यामुळे श्री.खरात यांनी स्वखर्चाने त्या काढून घ्याव्यात किंवा अभिलेखांचे अवलोकन करावे, असेही त्यांना कळविले होते. असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एन.पी.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एच.एस.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. कुरिअर मार्फत टपाल पाठविल्याचा पुरावा त्यांनी सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र गोविंद साळुंखे<br>मु.पो. वरचे गल्ली, तासगाव, ता. तासगाव, जि. सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (पश्चिम ) विभाग,<br>सांगली यांचे कार्यालय, सांगली | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तासगाव क्र.१, सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ८०५ / २०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | १९.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रविंद्र गोविंद साळुंखे<br>मु.पो. वरचे गल्ली, तासगाव, ता. तासगाव, जि. सांगली |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (पश्चिम ) विभाग,<br>सांगली यांचे कार्यालय, सांगली श्री. म. वि. खद्दे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तासगाव क्र.१, सांगली<br>श्री. र. रा. पाटील |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तासगाव क्र.१ मधील अभियंत्यांचे निवासी पत्ते खोटे व दिशाभूल करणारे दिले. या उपविभागात कामाला असलेल्या मैलकुली आदींच्या घरांचे पत्ते

अभियंत्याचे म्हणून दिले. एका अभियंत्याचा पत्ताही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता पश्चिम विभाग, सांगली यांनी फेरचौकशी करून दिला, तो एका मंत्रालयाच्या खाजगी सचिवांचा असून राजकीय दबाव आणण्यासाठी हा पत्ता दिला. अन्य एक सहाय्यक उपअभियंता वर्षानुवर्षे शासकीय निवासस्थानात राहत असूनही त्याचा वेगळा पत्ता दिला. संबंधित घर मालकाच्या तशा प्रमाणपत्राची प्रत द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रविंद्र गोविंद साळुंखे यांनी केली.

श्री. साळुंखे यांनी अभियंत्यांच्या पत्यापासून चार वर्षांत केलेल्या व चालू असलेल्या रस्त्याच्या कामापर्यंत अनेक प्रकारची माहिती मागितली होती. त्यांच्या मागणीनुसार माहिती व संबंधितांचे पत्ते, घर मालकांचे दि. २५.१.२०१० च्या प्रमाणपत्रासह दिले, असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग तासगाव क्र.१, सांगली श्री. र. रा. पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री. साळुंखे यांनी चार वर्षांतील विस्तृत माहिती सरसकट स्वरूपात मागितली आहे, तसेच रस्त्याच्या कामाबाबतचा व सद्यस्थितीबाबतचा अहवाल मागितला आहे. असा अभिप्राय 'माहिती'च्या अधिकारात देता येत नाही. ढोबळ मानाने माहिती मागण्याऐवजी विशिष्ट कामाची माहिती नेमकेपणाने मागितल्यास त्वरित उपलब्ध करून देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता पश्चिम विभाग, सांगली श्री. म. वि. खद्दे यांनी केले. त्यांचे प्रतिपादन रास्त आहे. अपीलकर्त्याने माहितीची सरसकट मागणी न करता नेमकेपणाने करणे आवश्यक आहे. कामामधील भ्रष्टाचार, नोंदीचा अपव्यय इ. विषयीच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 22 JUN 2010

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भानुदास यशवंत मोटे
मु.पो.तादुळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, वाळवा-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांदूळवाडी,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०७ / २०१० सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भानुदास यशवंत मोटे
मु.पो.तादुळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, वाळवा-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली श्री.पी.के.सुतार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांदूळवाडी,
ता.वाळवा, जि.सांगली श्री.डी.पी.सिंग

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.२.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत केलेल्या कामांची माहिती आपण अध्यक्ष / सचिव, ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, तांदूळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडे मागितली होती. वारंवार मागूनही त्यांनी माहिती दिली नाही म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वाळवा-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.भानुदास यशवंत मोटे यांनी केली.

अपीलकर्ता श्री.मोटे यांनी ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष/सचिव यांच्या नावे अर्ज केला होता. भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणी योजनेचे काम समितीमार्फत केले जाते. या समितीवर ग्रामपंचायतीचे नियंत्रण नाही. त्यामुळे समितीकडून मागवून घेऊन मिळालेली माहिती अपीलकर्त्यास दिली. समितीकडून उर्वरित माहिती मिळविण्याचे प्रयत्न करीत असून ती मिळताच दिली जाईल, असे अपीलकर्त्यास वेळोवेळी अवगत केले. आपल्या कक्षेतील कार्यवाही पूर्ण केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तांदूळवाडी ग्रामपंचायत, ता.वाळवा, जि.सांगली श्री.डी.पी.सिंग यांनी केले.

संबंधित समितीकडील अभिलेख हे शासनाच्या अधिकारकक्षेतील असून समितीने ते शासनाला सादर न केल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक ठरेल. तशी सूचना समितीचे अध्यक्ष / सचिव, ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, तांदूळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली यांना देऊन माहिती त्वरित पुरविण्यास कळवावे. त्यानुसार कार्यवाही न केल्यास शासकीय दस्तऐवज शासनाला सादर न करण्याबद्दल संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तांदूळवाडी ग्रामपंचायत, ता.वाळवा, जि.सांगली यांनी दि.१५.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

सौ. गंगाबाई (गंगूबाई ) बाबुराव पाटील
नायगाव पोलिस मुख्यालय, चाळ नं.४,
दुसरा माळा, खे.नं.४५, दादर, नायगाव,
मुंबई - ४०० ०१४. .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली .. उत्तरवादी

**१. जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी खुजगाव,
ता. शिराळा, जि. सांगली
**२. जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खुजगाव,
ता. शिराळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४५ + ८४६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २८.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिराळा,<br>ता. शिराळा, जि. सांगली सौ. मौसमी चौगुले-बर्डे<br><br>**१. जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी खुजगाव,<br>ता. शिराळा, जि. सांगली श्री. विश्वनाथ होनाजी भांगे<br><br>**२. जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खुजगाव,<br>ता. शिराळा, जि. सांगली श्री. संजय रंगराव मोरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जांची (जोडपत्र-अ) च्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

मिळकतीला वारसांची नोंद करून तशी माहिती देण्याची मागणी अपीलकर्त्या सौ. गंगाबाई (गंगुबाई) बाबुराव पाटील यांनी केली होती. त्यानुसार माहिती मिळाली नाही, म्हणून सहा महिन्यांनी त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिराळा, जि.सांगली यांच्याकडे अपील केले. संबंधित वारसनोंद करून ७/१२ व ८-अ चे उतारे अपीलकर्त्या सौ. गंगाबाई बाबुराव पाटील यांना देण्यात आले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, खुजगाव, ता. शिराळा श्री. विश्वनाथ होनाजी भांगे यांनी केले.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, तरीही त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

पुणे
दि. 10 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दगडू अरुण चव्हाण
मु.तांबेवाडी, पो.भातंबरे,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,**
विभागीय समाजकल्याण कार्यालय,
पी.एम.टी.वर्कशॉप जवळ,
स्वारगेट, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,**
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २३/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,**<br>मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सोलापूर<br>श्रीमती मनिषा फुले<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,**<br>विभागीय समाजकल्याण कार्यालय, पी.एम.टी.वर्कशॉप जवळ, स्वारगेट, पुणे<br>श्री.उमाकांत कांबळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नाईक प्राथमिक आश्रम शाळा, तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, या शाळेतील सह शिक्षकांच्या पदोन्नती संदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दगडू अरुण चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि. २३/०६/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला दि.१९/०६/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्याकडून मिळाली असून या संदर्भात माझी कसलीही तक्रार नाही. माझे संदर्भीय अपील निकाली काढावे', असे निवेदन दि.२१/०६/२०१० रोजी अपीलकर्ता श्री.चव्हाण यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशश्री चंद्रकांत हेंद्रे
बुधवार पेठ, १७१/१७२, माधवनगर, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, सांगली श्री.एस.डी.जोशी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.९.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.९.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.५.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या घराशेजारी असलेला खड्डा न बुजविल्याबद्दल ग्रामसेवकावर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकर्त्या श्रीमती यशश्री चंद्रकांत हेंद्रे यांनी मागितली होती. खाजगी जागेतील खड्डा ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून बुजवावा, अशी त्यांची मागणी होती. कार्यवाही न करणाऱ्या संबंधित ग्रामसेवकाची वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही त्यावर केली होती. सध्या खड्डा बुजविलेला आहे व संबंधित ग्रामसेवकाचे निधन झालेले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री.एस.डी.जोशी यांनी केले. ते लक्षात घेता माहिती व प्रशासकीय कार्यवाही या दोन्हीची पूर्तता जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
15 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती आक्काताई शामराव पाटील
रा.रेड, ता.शिराळा,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५६/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**<br>सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सांगली<br>यांचे प्रतिनिधी श्री.सु.म.काटे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**<br>सहकारी संस्था, सांगली<br>यांचे प्रतिनिधी श्री.जे.पी.शिंदे सहाय्यक निबंधक | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शामराव हरी पाटील यांच्या कडील थकित कर्जाची रक्कम वसुलीसाठी जप्त करण्यात आलेल्या वस्तूंची विक्री करुन आलेले पैसे थकित कर्ज खात्यात जमा केले आहेत का अथवा डेड स्टॉक म्हणून जमा केले आहे याबाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती आक्काताई शामराव पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२६/०५/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्त्या श्रीमती पाटील यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार मुदतीत मुद्देनिहाय व विनामूल्य माहिती व कागदपत्रे देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, सांगली यांचे लेखी निवेदन आयोगास सादर करण्यात आले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 24 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कमलाकर मस्के
चेअरमन, सोलापूर जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी
सहकारी पतसंस्था मर्यादित, **अपीलकर्ता**
११०/२, निर्मिती टॉवर्स, मोदीखाना
सोलापूर

**विरुध्द**

**शंकर परशुराम जाधव** **मूळ अर्जदार**
राजस्व नगर सहकारी गृहनिर्माण संस्था,
ब्लॉक नं.डी-५५१, प्रताप नगर रोड, विजापूर रोड,
सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५६/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सोलापूर जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित या पंतसंस्थेकडील सन १९९७-९८ पासून ते सप्टेंबर, २००७ अखेरपर्यंतची सभासदवर्गणी, कर्जे, वसुली इ.तपशील व पावत्यांच्या स्थळप्रतींची छायाप्रत | |

## विवेचन

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे दि.३/०१/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**पुणे.**
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नासर नबीलाल शेख
शनिवार पेठ (राजगुरूनगर), मु.पो.माधवनगर, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली,
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.संजय गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली,
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२६.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.नासर नबीलाल शेख यांनी सन १९९८ ते २००७ या काळातील सांगली महानगरपालिकेतर्फे केलेल्या औषध खरेदीत भ्रष्टाचार झाला असल्याचे नमूद करून त्याबाबतची माहिती मागितली होती. त्यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. त्यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरूपाची असल्यामुळे, तसेच त्यांची मागणी संदिग्ध स्वरूपाची व गृहितावर आधारित असल्यामुळे अभिलेखाचे अवलोकन व समक्ष चर्चेसाठी त्यांनी यावे, असे कळविले. त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या एकाच मुद्दयासाठी १६००० पृष्ठांच्या प्रती देणे आवश्यक ठरले असते व ते देणे शक्य नव्हते. परंतु कळविल्यानुसार समक्ष हजर न राहता त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सांगली, मिरज अणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांच्याकडे अपील केले. श्री.शेख सुनावणीला उपस्थित नव्हते. मात्र मूळ अर्जानुसार माहिती देण्याची विनंती करणारा अर्ज त्यांनी स्वतंत्रपणे त्याच दिवशी सादर केला. अभिलेख अवलोकनासाठी त्यांना बोलावून हव्या असलेल्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सांगली, मिरज अणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांनी दिले. त्यानंतर श्री.शेख व त्यांचे प्रतिनिधी यांना औषधे वितरण नोंद पुस्तिका पाहण्यासाठी उपलब्ध करून दिली. त्यावेळी त्यांनी औषध खरेदीच्या बिलांची मागणी केली. मूळ अर्जात ही मागणी नव्हती. त्यामुळे ती मागणी नाकारली. प्रथम अपिलाची सुनावणी, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व आयोगापुढील अपिलाची सुनावणी या तीनही वेळी अपीलकर्ता गैरहजर होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा

वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली, मिरज अणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली डॉ.रामचंद्र शिवराम हंकारे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली, मिरज अणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सांगली, मिरज अणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मागणी भाष्य, अभिप्राय, अन्वयार्थ या स्वरूपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती 'च्या व्याख्येत बसणारी नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

पुणे
25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमकुमार राम साळुंखे
सातारा रोड, हॉटेल रूचिसंगम समोर, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
जत, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तमकुमार राम साळुंखे
सातारा रोड, हॉटेल रूचिसंगम समोर, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती वर्षा शिंगण-पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
जत, ता.जत, जि.सांगली श्री.व्ही.ए.कांबळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.६.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२०.५.२०१० रोजी घेण्यात आली.

दि.१३.६.२००८ च्या अर्जाद्वारे आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली यांच्याकडे आपण केलेल्या अपिलानंतर दि.१३.३.२००९ रोजी पत्र पाठवून त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली यांनी माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.उत्तमकुमार राम साळुंखे यांनी केली. निवासी नायब तहसीलदार व तहसीलदार यांनी जमिनीच्या फेरफार नोंदीसंदर्भात योग्य कार्यवाही केलेली नाही व वरिष्ठांच्या आदेशाचेही पालन केलेले नाही, अशी लेखी व तोंडी तक्रार त्यांनी केली.

श्री.साळुंखे यांचा अर्ज दि.१३.६.२००८ चा असून दि.१७.६.२००८ रोजी ५२ रूपये शुल्क भरल्यानंतर त्यांनी आपल्या कार्यालयाकडील माहिती दिली. विविध प्रकरणांची माहिती त्यांनी मागितली होती. २५ वर्षांहून अधिक काळ पूर्वीचे असे हे अभिलेख शोधून व संबंधित कार्यासनांकडून मागवून घेऊन माहिती दिली. महसूल प्रक्रियेतील अपिलाचे निर्णय व त्या संदर्भातील कागदपत्रे अपिलामधून शोधून पूर्तता केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा

निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली श्री.व्ही.ए.कांबळे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जि.सांगली श्री.व्ही.ए.कांबळे यांनी जुनी माहिती प्रयत्नपूर्वक शोधून दिली असल्याचे दिसते. अपीलकर्त्यांच्या अन्य तक्रारी प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
15 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.ग.स.क्षीरसागर
मु.पो.अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.ग.स.क्षीरसागर
मु.पो.अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.हेमंत निकम

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण दिलेल्या दोन पत्रांवरील कार्यवाही कोणत्या अवस्थेत आहे व त्याबाबत काय करण्याचे ठरविले आहे, अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने आपण केली होती, परंतु माहिती मिळाली नाही. प्रथम अपील आपण केलेले नाही, असे निवेदन अपीलकर्ता ॲड.ग.स.क्षीरसागर यांनी केले.

कमाल नागरी जमीन धारणा मर्यादा कायद्याच्या संदर्भातील हा विषय आहे. बनावट ७/१२ असून तो दुरूस्त करावा, अशी श्री.क्षीरसागर यांची मागणी आहे. या प्रकरणी उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल असून न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला आहे. ही सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस, सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.हेमंत निकम यांनी केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या इतर मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय तायाप्पा मुळे **अपीलकर्ता**
नंदिवेस पवार गल्ली, विठ्ठल मंदिर,
ता.मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट व रिसर्च सेंटर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट व रिसर्च सेंटर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६८/२००९/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०८/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०६/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाविद्यालयात कामावर रुजू झाल्यापासून प्रत्येक महिन्याचे व वर्षाच्या पगार पत्रकाची छायाप्रत | |

## विवेचन

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला शासनकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक व

इतर मदत, निधी, तसेच वेतन अथवा वेतनेतर अनुदान मिळत नाही. तसेच कॉलेज़ला शासनाकडून जमीन मिळालेली नाही, असे चेअरमन डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट आणि रिसर्च सेंटर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दि.६/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केलेले आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- - 8 JUN 2010